# शिव ( भाग १ )

## शिवाविषयी अध्यात्मशास्त्रीय विवेचन

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '⁕' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**१. व्युत्पत्ती आणि अर्थ** २३

**२. काही नावांचा आध्यात्मिक अर्थ** २३

**३. वैशिष्ट्ये** २५

⁕ शारीरिक अन् भौतिक वैशिष्ट्ये (राखाडी रंग, तिसरा डोळा इ.) २५

⁕ आध्यात्मिक वैशिष्ट्ये २७

⁕ उत्तम गुरुसेवक २७

⁕ दुसऱ्याच्या सुखासाठी कोणताही त्रास भोगण्यास सिध्द असलेला २८

⁕ महाकालीचा आवेग शांत करणारा २८

**४. कार्य** २९

⁕ विश्वाची उत्पत्ती करणारा आणि जगद्गुरु २९

⁕ स्वतः साधना करून सर्वांची उत्तरोत्तर प्रगती करून घेणारा ३०

⁕ चित्तातील कामादी दोष नष्ट करणारा ३१

⁕ त्रिगुणातीत करणारा आणि काळानुसार कार्य ३२

**५. शिवाची रूपे : रुद्र, कालभैरव, वीरभद्र, भैरव ( भैरवनाथ ), वेताळ, भूतनाथ, नटराज आणि किरात** ३२

**६. परिवार : पत्नी, पुत्र, शिवगण, शिवदूत आणि वाहन ( नंदी )** ४०

**७. शिवलोक आणि निवास** ४४

**८. मूर्तीविज्ञान** ४५

**९. सनातन-निर्मित 'शिवाचे सात्त्विक चित्र आणि नामजप-पट्टी'** ६२

**१०. योगतज्ज्ञ दादाजी वैशंपायन यांनी प.पू. डॉक्टरांना दिलेल्या शिवाच्या त्रिमितीय चित्रात पालट होणे आणि ते जिवंत झाल्याचे जाणवून**

त्याच्या प्रकाशात वाढ होणे ६७
११. शिवाची प्रसिद्ध स्थाने : बारा ज्योतीर्लिंग, अमरनाथ अन् काशी ७१
१२. तंत्रशास्त्र ( शक्तीसंबंधित शास्त्र ) ७३
१३. शिव अन् शक्ति : शक्तीविना शिव कार्य करू न शकणे ७४
१४. अनुभूती ७६
* 'शिव ( भाग २ ) - शिवाच्या उपासनेमागील शास्त्र' याची
संक्षिप्त अनुक्रमणिका ७८

# मनोगत

एखाद्या देवतेसंबंधी आपल्याला अध्यात्मशास्त्रीय ज्ञान कळले, तर त्या देवतेविषयी आपली श्रद्धा अधिक वाढायला साहाय्य होते. श्रद्धेमुळे साहजिकच उपासना भावपूर्ण व्हायला साहाय्य होते अन् भावपूर्ण उपासना ही अधिक फलदायी असते. या दृष्टीने या ग्रंथांत शिवाविषयीचे सर्वसाधा-रणतः इतरत्र कोठेही न आढळणारे, पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय विवेचन करण्यावर भर दिला आहे.

शिवाची काही नावे आणि गंगा, तिसरा डोळा, नाग, भस्म, रुद्राक्ष इत्यादी शिवाच्या वैशिष्ट्यांचा आध्यात्मिक अर्थ; महातपस्वी, भुतांचा स्वामी, विश्वाची उत्पत्ती करणारा यांसारखी आध्यात्मिक वैशिष्ट्ये अन् कार्ये; रुद्र, कालभैरव, नटराज इत्यादी रूपे; ज्योतिर्लिंगे इत्यादींविषयीची तात्त्विक विवेचनासह भस्म लावणे, नंदीच्या शिंगांमधून शिवलिंगाचे दर्शन घेणे, शिवाला बेल आणि अक्षता वहाणे; पण हळद-कुंकू न वाहणे यांसारखी उपासनेशी संबंधित प्रायोगिक विवेचनही शास्त्रा-सह दिली आहे. शृंगदर्शन, शिवाला बेल वहाणे, अभिषेक करणे इत्यादींच्या वेळी सूक्ष्मातून नेमकी काय प्रक्रिया घडते, हे सर्वसामान्य व्यक्तीला कळू शकत नाही. हे कळण्याची क्षमता असलेल्या सनातनच्या साधकांनी केलेली 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीची परीक्षणे' आणि काढलेली 'सूक्ष्म-ज्ञानाविषयीची चित्रे' हे या ग्रंथांचे एक आगळे वैशिष्ट्य आहे.

शिवाविषयीचे हे अध्यात्मशास्त्रीय विवेचन शिवभक्तांना आणि शिवाची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने यासंदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. रामायण वाचले की श्रीरामाची, श्री गणपति अथर्वशीर्ष वाचले की श्री गणपतीची अन् देवीमाहात्म्य वाचले की देवीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याच प्रकारे या ग्रंथातील

विवेचन वाचून 'आपणही शिवाची उपासना करावी', असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अशा प्रकारच्या उपासनेने सर्वांचीच आध्यात्मिक उन्नती लवकर होत नाही; कारण शिव इत्यादी देवतांची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा अधिक लाभ होतो, नाहीतर फार साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. शिवाची उपासना ही पुढच्या टप्प्याची उपासना आहे. ती करणे आवश्यक आहे कि नाही, हे सर्वसाधारण व्यक्तीला कळत नाही, तर अध्यात्मदृष्ट्या उन्नत असलेलेच ते सांगू शकतात; म्हणून सर्वसाधारण व्यक्तीने केवळ ज्ञात (माहीत) व्हावे म्हणूनच हे ग्रंथ वाचावेत. पुढे शिवाची अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून आपल्या कुलदेवतेच्या नावाचा 'श्री... (कुलदेवी/कुलदेव यांच्या नावाचा चतुर्थीचा प्रत्यय)... नमः ।' या पद्धतीने (उदा. कुलदेवी भवानी असल्यास 'श्री भवानीदेव्यै नम:' याप्रमाणे) नामजप करावा. पुढे गुरूंनी शिवाचा नामजप करण्यास सांगितले, तर त्या वेळी या विवेचनाचा उपयोग शिवावरील श्रद्धा वाढण्यासाठी होईल. इतरांना या ग्रंथांतील विवेचन वाचून शिवाविषयी काहीतरी नवीन कळले, असे जाणवेल.

हे ग्रंथ वाचून शिवाच्या उपासकांची शिवावरील श्रद्धा दृढ होवो आणि त्यांना अधिक साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**